N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

PDF Compressor Free Version

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** चंद्रपूर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0402 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/05/2024 02:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 25/04/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/05/2024
**Time From (वेळेपासून):** 13:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/05/2024 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/05/2024 02:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** राज्य उत्पादन शुल्क विभाग , कार्यालय चंद्रपुर ,चंद्रपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name (नाव):** महादेव गोविंदराव पिंपळकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) **:**

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष)**:** 1955

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व)**:** भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.)**:**

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.)**:**

**Date of Issue** (दिल्याची तारीख)**:**

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण)**:**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता)**:**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घुग्घूस वार्ड क्र 06,केमीकल वार्ड, तुळजा निवास,शिवाजी महाराज चौक, घुग्घूस,घुग्घूस,घुग्गस,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घुग्घूस वार्ड क्र 06,केमीकल वार्ड, तुळजा निवास,शिवाजी महाराज चौक, घुग्घूस,घुग्घूस,घुग्गस,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय)**:**

(j) **Phone number** (फोन नं.)**:**

**Mobile** (मोबाइल नं.)**:** 91-9373585803

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता)**:**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय जयसिंगराव पाटील | | | 1. राज्य उत्पादन शुल्क विभाग,, कार्यालय बालाजी वार्ड ,चंद्रपूर, चंद्रपूर,चंद्रपूर शहर,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | चेतन माधवराव खारोडे | | | 1. राज्य उत्पादन शुल्क विभाग,, कार्यालय बालाजी वार्ड,चंद्रपुर , चंद्रपुर ,चंद्रपूर शहर,चंद्रपुर, महाराष्ट्र,भारत |

PDF Compressor Free Version

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | अभय बबनराव खतीळ | | | 1. बाबुपेट वार्ड क्र 1 ,डिएड कॉलजच्या मागे ,चंद्रपुर ,चंद्रपुर ,चंद्रपूर शहर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | सन्डीस कपनीची 32 GBसमतेचे मेमरी कार्ड 3 | 0.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | आरोपी क्र 2 यांचे कडुन तक्रारदार यांचे अर्ज व इतर कागदपत्रे | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 200 चलनी नोटा) | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

100,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

ठिकाणः- ला.प्र.वि कार्या,चंद्रपूर
दिनांकः- 07/05/2024

मी महादेव गोविंदराव पिंपळकर, वय 69 वर्ष व्यवसाय- से.नि. पोलीस अधिकारी, स. घुग्घूस वार्ड क्र. 06, केमीकल वार्ड, तुळजा निवास, शिवाजी महाराज चौक, घुग्घूस, ता.जि. चंद्रपूर येथे राहतो. मी दिनांक 25/04/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर, येथे प्रत्यक्ष हजर येऊन श्रीमती मंजुशा भोसले, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर, यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे. '' सविनय विनंती याप्रमाणे आहे की, मी वरील तक्रारदार नमुद पत्यावर परिवारासह राहतो. मी सन 2013 मध्ये पोलीस विभागातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावरून सेवानिवृत्त झालेलो आहे. मौजा घुग्घूस ता.जि. चंद्रपुर येथे माझे मालकीचे ''गोदावरी बार अँन्ड रेस्टॉरंट'' आहे. ज्याचा परवाना क्रमांकFLIII/ 372 असा आहे. आता मला बिअर शॉपीचा परवाना काढायचा असल्याने मी दिनांक 20/04/2023 रोजी राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूर येथे अर्ज सादर केला आहे. त्याकरीता मी मा. अधीक्षक, राज्य उत्पादन षुल्क विभाग, चंद्रपूर यांचे नावाने 100/-रू. चे चालान सुध्दा भरलेले होते. सदर चालान भरल्यानंतर मी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयात आजपर्यंत बरेचदा जाऊन घुग्घूस बिट अधिकारी (एक्साईज सब ईन्स्पेक्टर) श्री. चेतन खारोडे साहेब यांना तसेच अधीक्षक श्री. पाटील साहेब यांना परवान्याबाबत विचारणा केली. त्यावर त्यांनी मला उदया या, परवा या व घेऊन जा असे म्हणून प्रत्येक वेळी टाळाटाळ केली आणि माझे बिअर शॉपी परवानाचे काम केले नाही. त्यांनतर मी साधारण माहे नोव्हेंबर/2023 महिण्यात पुन्हा राज्य उत्पादन शुल्क विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे जाऊन बीट अधिकारी श्री. चेतन खारोडे यांना भेटलो असता ते म्हणाले की तुमचा फार्म सापडत नाही आहे. तुम्ही नवीन फार्म भरा असे म्हणाले. त्यावरून मी दिनांक 06/03/2024 रोजी माझे सहीनिशी बंद बाटलीतुन बियरची विक्री करण्याबाबतचा नविन अर्ज सादर केला. त्यानंतर साधारणतः चार-पाच दिवसांनी मी राज्य

PDF Compressor Free Version

उत्पादन शुल्क कार्यालय, चंद्रपुर येथे मी दिलेल्या अर्जाबाबत विचारपुस करणेकामी गेलो असता तिथे श्री चेतन खारोडे हे मिळुन आले. त्यांनी बियर विक्रीचा परवाना पाहिजे असेल तर तुम्हाला त्याकरिता उत्पादन शुल्क अधीक्षक व माझेकरिता 1,30,000/-रू(एक लाख तीस हजार रूपये) द्यावे लागतील अन्यथा आपणांस बियर विक्रीचा परवाना मिळणार नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना नाईलाजास्त्व होकार देवुन तिथुन निघुन आलो. त्यानंतर तिन चार दिवसांनी श्री. चेतन खरोडे साहेब हे सुध्दा घुग्घूस येथे माझेकडे आले होते व त्यांनी बिअर षॅपीचे परवाना करीता स्वतःकरिता व श्री. पाटील साहेबांकरीता 1,30,000/-रू. ची मागणी मला केली आणि जर पैसे दिले नाही तर तुमचे बिअर षॉपीचे परवानाचे काम होणार नाही असे म्हणाले. परंतु त्यावेळी माझेकडे दोन्ही गैरअर्जदार यांना लाच म्हणुन देण्याकरिता रूपये उपलब्ध नसल्याने मी आपल्याकडे तक्रार देण्यासाठी आलो नव्हतो. त्यांनतर मी दिनांक 24/04/2024 रोजी घुग्घूस येथे आपले 'गोदावरी बार अँन्ड रेस्टोरट' येथे हजर असतांना श्री. चेतन खारोडे यांचा मध्यस्थी माणूस नामे बंडू उर्फ अशोक रामटेके रा. घुग्घूस याने मला मो. क्र. 7020429496 नी माझे मोबाईल क्र.9373585803 वर फोन करून म्हणाला की, ''तुमचे चालान तयार आहे बँकेत पैसे भरून टाका.'' त्यावरून मी त्याला ''आता बँक बंद झाली असुन सदर चालान ची पावती नंतर भरतो'' म्हणलो. त्यानंतर बंडू रामटेके हा संध्याकाळी माझेकडे घुग्घूस येथे आला व मला म्हणाला की, ''चेतन खारोडे साहेबांनी सांगितले की, ते उद्या दिनांक 25/04/2024 रोजी स्वतः घुग्घूसला येणार व चालन ची पावती तुमच्याकडे देणार आहेत''. परंतु त्या कामाकरिता उत्पादन शुल्क अधीक्षक श्री पाटील साहेब व बिट अधिकारी श्री चेतन खारोटे यांनी 1,30,000/- रू.असे सांगितले. मला उत्पादन शुल्क चंद्रपुर चे अधीक्षक श्री पाटील साहेब व बिट अधिकारी श्री चेतन खारोडे यांना 1,30,000/- रुपये लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी दुपारी 01/00 वा. सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे हजर येवुन सदरची तक्रार तुम्हाला देत आहे. तरी माझा उत्पादन शुल्क चे अधीक्षक श्री पाटील साहेब व बिट अधिकारी श्री चेतन खारोटे यांचेषी माझा कोणताही आर्थिक व उसनवारीचा व्यवहार नाही. माझेकडे लाच रक्कमेत देण्याकरीता 1,30,000/-रू. उपलब्ध नसल्याने मी कार्यवाहीकरीता माझे वैयक्तीक बचतीतुन 1,00,000/-रु. नगदी जमा केलेले आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी मला बिअर शॉपी (विक्री) चा परवाना देण्याकरीता 1,30,000/-रू. ची मागणी करणारे उत्पादन शुल्क चंद्रपुर चे अधीक्षक श्री पाटील साहेब व बिट अधिकारी श्री चेतन खारोटे यांचेविरूध्द माझी कायदेशीर तक्रार आहे.'' याप्रकारची लेखी तक्रार दिली.

सदर कार्यवाहीकरीता लोकसेवक पंचांची आवश्यकता असल्याचे मला सांगुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी त्यांचे कार्यालयातील पोलीस अंमलदार राकेश जांभुळकर यांना मा. तहसीलदार, तहसील कार्यालय चंद्रपूर यांचे नावे दोन लोकसेवक पंच मिळणेबाबत पत्र तयार करून ला.प्र.वि. कार्यालयातून 12/50 वा. रवाना केले. पोलीस अंमलदार राकेश जांभुळकर हे तहसील कार्यालय, चंद्रपूर येथून दोन लोकसेवक पंच घेवून ला.प्र.वि. कार्यालय चंद्रपूर येथे 13/40 वा. परत आले. त्यानंतर पंच 1) श्री.विष्णुभगवान शंकर अडागळे, वय 51 वर्षे, नोकरी- महसूल सहायक, तहसील कार्यालय, चंद्रपूर. 2) श्री. हेमंत सदाषीव उमरे, वय 42 वर्षे, नोकरी- अव्वल कारकून, तहसील कार्यालय, चंद्रपुर. या दोन्ही पंचाना लोकसेवकांविरुध्द लाच मागणीच्या संबधाने सापळा आयोजित करावयाचा आहे, त्याकामी आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? अषी संमती विचारली असता, त्या दोघांनीही पंच म्हणुन काम करण्याची लेखी संमती दिली. त्यानंतर दोन्ही पंचांना माझेषी परिचय करुन दिला व माझीच तक्रार असल्याचे सांगीतले. श्रीमती भोसले मॅडम यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मी दिलेली लेखी तक्रार वाचुन पाहिली. त्यानंतर माझे तक्रारीवर दोन्ही पंचानी तसेच श्रीमती भोसले मॅडम यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत.त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार पो.हवा.नरेषकुमार नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मीजमा केलेली सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी रक्कम 1,00,000/- रू. ज्यामध्ये 500/-रू. दराच्या 200 चलनी नोटांचे क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म समजावले व लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावून प्रात्यक्षीक करून दाखविले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा क्र. 1 नोंद घेण्यात आली आहे.)

पंचनामा क्र. 01 ची कार्यवाही आटोपल्यानंतर श्रीमती भोसले मॅडन यांनी मला पंच क्र. 1 यांचेसह गै.अ. चेतन खारोडे यांचे कार्यालयात अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपुर येथे पाठवून पडताळणी/सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. परंतु राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाचे काही दिवसांपूर्वीच तात्पुरते स्थानांतरण

PDF Compressor Free Version

झालेले असून ते सध्या बालाजी वार्ड, चंद्रपूर परिसरात कुठे आहे याबबत मला महिती नसल्याने सुरूवातीस मी स्वतः कार्यालयाचा पत्ता बघून येणार असल्याचे भोसले मॅडम यांना सांगितले. त्यावरून भोसले मॅडम यांनी मला सांगितले की, ते, दोन्ही पंच आणि कार्यालयीन स्टाफसह बिनबा गेट, चंद्रपूर येथून मौजा चोराळा गावाकडे जाणारे रोडचे दिशेने काही अंतरावर थांबून राहणार असून मला कार्यालयाचा पत्ता मिळाल्यानंतर बिनबा गेट चंद्रपूर येथून चोराळा गावाचे दिशेने येण्यास सांगितले. त्यांनतर मी आणलेले मारूती स्विफ्ट डिझायर चारचाकी वाहन क्र. एम. एच.05 बी.जी.- 1990 या गाडीने पठाणपुरा परिसरात तात्पुरत्या स्वरूपात स्थित असलेले राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाचा पत्ता पाहण्याकरीता अंदाजे 15.00 वा. रवाना झालो. मी राज्य उत्पादन षुल्क विभाग, चंद्रपूर कार्यालयाचा पठाणपुरा,चंद्रपूर परिसरात शोध घेत असतांना मला सदर कार्यालय हे बालाजी वार्ड चंद्रपूर येथे असल्याचे समजले त्यावरून मी बालाजी वार्ड चंद्रपूर परिसरात सदर कार्यालयाचा शोध घेतला असता सदर कार्यालय ''गडला हनुमान मंदिर (देवस्थान)'' जवळ असलेल्या एका दुमजली ईमारतीमध्ये असल्याचे दिसले. त्यानंतर सदर कार्यालयाचा शोध घेवून श्रीमती भोसले मॅडम यांनी सांगितलेल्या नियोजित ठिकाणी पोहचत असतांनाच माझा मुलगा प्रविण पिंपळकर यांनी त्याचे मोबाईलवरून मला फोन करून सांगितले की, श्री. चेतन खारोडे व ईतर काही व्यक्ती त्यांचेकडे घुग्घूस येथे त्यांचे ''गोदावरी बार अँन्ड रेस्टॉरंट'' येथे आलेले आहेत असे सांगितले. त्याच वेळी मी गै.अ. चेतन खारोडे यांना फोन करून केला असता गै.अ. यांनी मला सांगितले की, त्यांना घुग्घूस येथे आणखी काही वेळ लागणार असल्याचे सांगितले.

त्यावरून भोसले मॅडम यांनी गै.अ. श्री. चेतन खारोडे यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही घुग्घुस येथे जाऊन करण्याचे ठरविले. त्यानंतर भोसले मॅडम संपुर्ण सापळा सदस्यांसह षासकिय वाहन क्र. एम.एच. 34-8788 ने घुग्घूसकडे रवाना झाले. तसेच मला माझे मारूती स्विफ्ट डिझायर चारचाकी वाहन क्र. एम.एच.05 बी.जी.- 1990 ने षासकीय वाहनाच्या मागे मागे घेवुन येण्याची सुचना देवुन दिली. 16/40 वाजता दरम्यान श्रीमती भोसले मॅडम यांनी षासकीय वाहनाने मौजा घुग्घूस येथून अंदाजे 5 कि.मी. आधी उजव्या दिशेने मौजा षेनगांव कडे जाणारे डांबरी रोडवरील रिध्दी-सिध्दी या कॉटन मिलच्या मागील षेतषिवारात षासकीय वाहन थांबविले. मी सुध्दा त्यांचे मागेच आपले स्विफ्ट डिजायर चारचाकी वाहनाने सदर ठिकाणी पोहोचलो.

श्रीमती भोसले मॅडम यांनी दोन्ही पंच व स्टाफला मी दिलेल्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावून सांगुन आम्ही थांबुन असलेल्या मौजा शेनगांव कडे जाणारे डांबरी रोडवरील रिध्दी-सिध्दी या कॉटन मिलच्या मागील शेतशिवारातून पडताळणी/सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरून मी गै. अ.खारोडे यांना माझे मोबाईलवरून फोन लावून फोन स्पिकरवर ठेवून काही वेळातच घुग्घूस येथे पोहचत असल्याबाबत सांगितले असता गै.अ. खारोडे यांनी ''ठिक आहे आम्ही तोपर्यंत ईतर ठिकाणी जावून येतो'' असे म्हणाले.

त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. अंगझडतीत अंगावरील पेहराव व मिळुन आलेल्या सामानाची वेगळी यादी करण्यात आली. अंगझडतीत मिळालेले साहित्य व रोख रक्कम मला वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर भोसले मॅडम, दोन्ही पंच व मी सुध्दा स्वाक्षरी केली. त्यांनतर श्रीमती भोसले मॅडम यांनी मला पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. श्रीमती भोसले मॅडम यांच्या सुचनेवरुन पोलीस अंमलदार पो.हवा. नरेषकुमार नन्नावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही (CCTNS प्रणाली मध्ये 8000 शब्द मर्यादा असल्याने उर्वरीत फिर्याद मुळ फिर्यादी प्रमाने आहे.)

PDF Compressor Free Version

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PRABHAWATI TRYAMBAK EKURKE(I (Inspector)) / POBN085424 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRABHAWATI TRYAI

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN085424

ठाणे अधिकारी / अंमलदार
पोलीस ठाणे, चंद्रपूर शहर

PDF Compressor Free Version

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)